करोना/२०२०/सूचना/आदेश/क्र.९८९

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.०४/०४/२०२०

प्रति,
श्री.प्रदिप कुलकर्णी,जिल्हा समन्वयक,
स्टेट बँक ऑफ इंडिया

विषय :- अपर तुडील,ता.महाड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बंद ठेवलेबाबत.
संदर्भ:- १) या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र.साशा/कार्या/ब-५/करोना/प्रतिबंध उपाययोजना/२०२० दि.२०/०३/२०२०
२) या कार्यालयाकडील नोटीस क्र.साशा/कार्या-१/ ब-५/ क.वि.प्र.उ ./बँक /नोटीस/२०२० दि.२६/०३/२०२०
३) आपलेकडील खुलासा दि .२७/०३/२०२०

शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२० मधील नियमानुसार या कार्यालयाकडून करोना विषाणुचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केलेल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र.साशा/कार्या/ब-५/करोना/प्रतिबंध उपाययोजना/२०२० दि.२०/०३/२०२० अन्वये अत्यावश्यक बाब म्हणून रायगड जिल्हयातील सर्व बँका चालू ठेवण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

तथापि, आपल्या अधिनस्त असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा अपर तुडील,ता.महाड या बँकेने चार दिवस बँक बंद ठेवल्याने तसेच एटीएम मध्ये देखील कॅश उपलब्ध नसल्याने तेथील नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागल्याने याबाबत त्या अनुषंगाने संदर्भिय २ कधील दि.२६/०३/२०२० चे नोटीसीनुसार आपण दि.२७/०३/२०२० रोजी खुलासा सादर केलेला आहे.

मात्र आपण केलेला खुलासा व संबंधीत बँक अधिकारी यांचे वर्तन अत्यावश्यक सेवेच्या अनुषंगाने योग्य नसून आपण लॉक डाऊन चा काळात अधिक जागरुक राहून नागरिकांना सेवा देणे आवश्यक होते. मात्र आपण तसे न केल्याने आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या बँकावर आपले कोणतेही प्रकारचे नियंत्रण दिसून येत नाही अथवा आपल्या कडून नियंत्रण ठेवले जात नाही ही बाब योग्य नसून याबाबत आपणास या पत्राव्दारे समज देण्यात येत आहे. याची आपण गंभीरतेणे नोंद घ्यावी. अन्यथा असे परत निदर्शनास आल्यास कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**प्रत:-**१) प्रादेशिक अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया,सेक्टर २९, सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई,यांजकडे माहितीसाठी व आवश्यक ती कार्यवाही
२) व्यवस्थापक,जिल्हा अग्रणी बँक,रायगड यांजकडे माहितीसाठी व आवश्यक ती कार्यवाही